# अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

जा.क्र.को.शे.सं.प्र./कंत्राटी/ ६० /२०२४ दिनांकः १०/०६/२०२४

**निविदा सुचना**

**विषयः- सन २०२४-२०२५ मध्ये अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प, डॉ. पं. दे.कृ.वि. अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील करावयाचे कामे उदा, विविध संशोधनात्मक प्रयोगांचे व्यवस्थापन, शेती व इतर कामे कंत्राट पध्दतीने प्रती हेक्टरी/प्रती दिन/प्रती नग करण्याकरिता वैध परवानधारक कंत्राटदाराकडून मजूराचे (स्त्री/पुरूष) निविदा दर (कोटेशन) बोलविण्याबाबत...**

संदर्भः- जा.क्र. संसं/शा.अ./कं.द./४०३/२०२२ दिनांकः ०८/०६/२०२२

वरील संदर्भांकित विषयाच्या अनुसरून आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील करावयाचे कामे उदा, विविध संशोधनात्मक प्रयोगांचे व्यवस्थापन, शेती व इतर कामे कंत्राट पध्दतीने करण्यासाठी प्रती हेक्टरी/प्रती दिन/प्रती नग करण्याकरिता वैध परवानधारक कंत्राटदाराकडून मजूराचे (स्त्री/पुरूष) निविदा दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदा मसुदा/निविदेचे स्वरूप सोबत जोडण्यात आलेले आहे. सोबत जोडलेल्या प्रपत्रात तपशीलप्रमाणे दिनांक १८.०६.२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत सीलबंद लिफाफ्यामध्ये संबंधित दस्तावेजासह खालील दिलेल्या अटी व शर्तीस अनुसरून सादर करावे.

**अटी व शर्ती**

१. निविदा पत्रक/कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० या वेळेत स्वीकारल्या जातील.

२. निविदा/कोटेशन प्रमुख शास्त्रज्ञ, अखिल भारतीय कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प डॉ. पंदेकृवि, अकोला यांचे नावे सीलबंद लिफाफामध्ये पाठवावी.

३. कंत्राटदाराकडे संबंधित कामाचा वैध परवाना असणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराला परवाना व संबंधित इतर सर्व आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

४. निविदा/कोटेशन मधील संबंधित शेती कामे व इतर कामे कंत्राट पध्दतीने करण्याचे दर नियमाप्रमाणे सर्व करासह नमूद करण्यात यावे तसेच त्या कराचा विहित मुदतीमध्ये भरणा करण्यासाठी वापरण्यात येणा-या स्त्री/पुरुष मजुरांचे व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

५. अखिल भारतीय कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील शेती व इतर कामे करीत असतांना यंत्राचे/वाहनाचे/नवीन सुट्या भागांचे ई. नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.

६. अखिल भारतीय कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील शेती व इतर कामे करीत असतांना कुठलीही दुर्घटना/अपघात/जीवितहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी/अधिकारी किंवा विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

७. कंत्राटदाराने पुरवठा केलेल्या मजुराने अनुचित प्रकार केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. सदर कंत्राटी मजुरांची जबाबदारी पुरवठादाराची राहील.

८. काही विपरीत घटना तथा विपरीत बाबी/प्रसंगी कंत्राट आपोआप संपुष्टात येईल.

९. पुरवठादाराचे मजुर पूर्णतः कंत्राटी पध्दतीने असतील त्यात विद्यापीठ प्रशासनाच कोणताही संबंध कामावर ठेवण्याबाबत राहणार नाही, मजुरांची कुठल्याही प्रकारची कामावर असल्याची जेष्ठता यादी विभागामार्फत देण्यात येणार नाही.

१०. कंत्राटदारास कामाच्या आवश्यकतेनुसार मजुर उपलब्ध करून न दिल्यास करार रद्द करण्यात येवुन सदर कंत्राटदारास या पुढील निविदा प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

११. अखिल भारतीय कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील देण्यात आलेली शेती व इतर कामे वेळेत पूर्ण करण्यात यावी, कामाबाबत विभागाकडून तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहिल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

१२. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे सबंधित कंत्राटदारांना बंधनकारक राहील.

१३. कंत्राटदारांनी देयक सादर करतेवेळी बेंक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी, अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

१४. अखिल भारतीय कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील शेती व इतर कामाकरिता पुरविण्यात आलेल्या कंत्राटी कामगाराचे देयक काम पूर्ण व विहित वेळेत पूर्ण केल्यावर तसेच संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांना काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कंत्राटी कामगाराचे देयक पारित करण्यात येईल.

१५. अखिल भारतीय कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील शेती व इतर कामे करण्यासाठी वापरण्यात येणा-या स्त्री/पुरुष तांत्रिक कामगारांना,

कामगार(Labour Act) कायद्यानुसार किमान वेतन, विमा संरक्षण, भविष्य निर्वाह निधी देणे, कॅशलेस पध्दतीचा अवलंब करणे इत्यादीची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१६. अखिल भारतीय कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील शेती व इतर कामे करीत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी, विभाग प्रमुख कृषि शक्ती व औजारे, मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे सक्षम मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

१७. अखिल भारतीय कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील शेती व इतर कामे हि एक वर्षामधील खरीप, रब्बी व उन्हाळी या तिन्ही हंगामाकरिता असून कंत्राटी कामगाराचे दर एक वर्षांकरिता वैध राहतील.

१८. अखिल भारतीय कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील शेती व इतर कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेले कंत्राटी कर्मचारी हे १८ वर्षाच्या वर असावे तसेच ६० वर्षापेक्षा कमी असावे व त्यास कोणत्याही प्रकारचे अपंगत्व नसून ते शारीरिकदृष्ट्या सक्षम असावेत.

१९. कंटात्रदारास देय रक्कमेच्या १० टक्के रक्कम अमानत रक्कम म्हणून प्रभारी अधिकारी यांचेकडे जमा करावी लागेल.

२०. कोणतीही निविदा पूर्णपणे किंवा अंशतः स्वीकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार प्रमुख शास्त्रज्ञ, कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प, डॉ. पंदेकृवि., अकोला यांचेकडे राखून ठेवलेले आहेत.

२१. निविदा प्रक्रिया राबवितांना तांत्रिक अथवा प्रशासकीय अडचण आल्यास निविदा प्रक्रिया कोणत्याही स्तरावर थांबविण्याचे अथवा रद्द करण्याचे अधिकार प्रमुख शास्त्रज्ञ, कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प, डॉ. पंदेकृवि., अकोला यांचेकडे राखून ठेवलेले आहेत.

प्रमुख शास्त्रज्ञ
अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प
डॉ. पंदेकृवि, अकोला

## निविदा (कोटेशन) मसुदा

अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील विविध संशोधनात्मक प्रयोगांचे व्यवस्थापन, शेती व इतर कामे कंत्राट पध्दतीने प्रती हेक्टरी/प्रती दिन/प्रती नग करण्याकरिता कुशल/अकुशल मजूरांचे (स्त्री/पुरूष) दर खालील प्रमाणे देण्यात यावे.

| अ.क्र. | कामाचा तपशील | | दर (रूपये) |
|---|---|---|---|
| अ | शेती व इतर कामे | | |
| १ | नांगरणे | ट्रॅक्टरने | प्रती हेक्टरी |
| | | ट्रॅक्टरने (दोन फाळी) | प्रती हेक्टरी |
| | | ट्रॅक्टरने (तीन फाळी) | प्रती हेक्टरी |
| २ | मोगडणे | फंटावाही/पंजी | प्रती हेक्टरी |
| ३ | वखरणे | ट्रॅक्टरने | प्रती हेक्टरी |
| | | बैलाने (वखर, मजुरासहीत) | प्रती हेक्टरी |
| | | रोटावेटर | प्रती हेक्टरी |
| | | पट्टी पास/जांभूळ वाही | प्रती हेक्टरी |
| ४ | काशा/धसकटे/कचरा वेचणे | | प्रती हेक्टरी |
| ५ | शेणखत भरणे/ उतरविणे/ वाहतुक ५ टन | वाहन व मजुरासह | |
| ६ | शेणखत पसरविणे ५ टन | | |
| ७ | पेरणी | | |
| | टोकण पध्दतीने पेरणी | जास्त अंतर | प्रती हेक्टरी |
| | | कमी अंतर | प्रती हेक्टरी |
| | बैलजोडीद्वारे पेरणी | बैलजोडीद्वारे पेरणी करणे, खत देणे व बी झाकणे (बैलजोड्या २ पुरुष मजुरासह व ६ स्त्री मजुर) | प्रती हेक्टरी |
| | ट्रॅक्टरने | बी.बी.एफ. यंत्राद्वारे पेरणी पास पट्टी सह | प्रती हेक्टरी |
| | ट्रॅक्टरने | पेरणी यंत्राद्वारे पास पट्टी सह | प्रती हेक्टरी |
| ८ | तणनाशकाची फवारणी (७०० लि पाणी) | नॅपसॅक स्प्रे मजुरासहीत | प्रती हेक्टरी |
| ९ | विरळणी | जास्त अंतरावरील पीक | प्रती हेक्टरी |
| | | कमी अंतरावरील पीक | प्रती हेक्टरी |
| १० | कोळपणी/डवरणी | बैल जोडी मजूरासह | प्रती हेक्टरी |
| | | ट्रॅक्टरने | प्रती हेक्टरी |
| ११ | खुरपणी/निंदण | खरीप | प्रती हेक्टरी |
| | | रब्बी | प्रती हेक्टरी |
| १२ | वरखत देणे | सरत्याद्वारे | प्रती हेक्टरी |
| | | बांगडी पध्दतीने | |
| | | हाताने फेकणे | |
| १३ | पिकाला पाणी देणे/रान भिजविणे | मोकाट पध्दत | प्रती हेक्टरी |
| | | स्प्रिंकलर पध्दत | प्रती हेक्टरी |
| १४ | फवारणी | साधा स्प्रे | प्रती हेक्टरी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पावर स्प्रे<br>पावर स्प्रे (प्रती तास पेट्रोल सह) | प्रती हेक्टरी |
| १५ | पीक काढणी/कापणी | मुंग शेंगा तोडणे, शेंगा बडवणे व उधळणे | प्रती हेक्टरी |
| | | सोयाबीन/उडीद कापणी व खळयावर जमा करणे | प्रती हेक्टरी |
| | | ज्वारी/बाजरी/मका कापणी व बांधणी, कणस खुडणे, खळयावर जमा करणे | प्रती हेक्टरी |
| | | तूर कापणी व बांधणी, जमा करणे, व बडवणे व उपणने | प्रती हेक्टरी |
| | | भूईमंग काढणी, शेंगा तोंडणी व पीक जमा करणे | प्रती हेक्टरी |
| | | जवस काढणे व गोळा करणे, बडवीणे व उपणने | प्रती हेक्टरी |
| | | करडई कापणे, बांधणे, गोळा करणे | प्रती हेक्टरी |
| | | हरभरा कापणे, बांधणे, गोळा करणे | प्रती हेक्टरी |
| | | मळणी (थ्रेसर) प्रती क्विंटल मजुरासह | |
| १६ | वळई रचणे | १००० पेंडयासाठी | |
| १७ | कापुस वेचणे | प्रती किलो | |
| | | कापुस बोजा भरणे (२ क्विंटल)प्रती नग | |
| १८ | चाळणी, वजन | चाळणी करून वजन करणे (प्रती क्विंटल) | |
| १९ | चाळणी, वजन करणे लोडींग व अनलोडींग व त्यासाठी वाहतूक | लोडींग व अनलोडींग (प्रती क्विंटल) | |
| २० | पोत्याची थप्पी लावणे (प्रती क्विंटल) | | |
| २१ | दांड तयार करणे | | |
| २२ | धसकटे वेचणे | | प्रती हेक्टरी |
| २३ | उपटतण करणे | | प्रती हेक्टरी |
| २४ | प्रक्षेत्रावरील पीक राखणे | १० हेक्टर | |
| २५ | कपाशी जिनींग करणे | प्रती क्विंटल | |
| २६ | कपाशी स्वच्छ करणे | प्रती क्विंटल | |
| ब | भाजीपाला पिकामधील कामे | | |
| २७ | पालेभाज्या (मेथी, पालक, शेपू, चुका, कोथिंबीर व मोहरी) | | |
| | बी पेरणी | ३ x ३ मीटर वाफा प्रति वाफे | |
| | खतपाणी, निंदणी, फवारणी | ३ x ३ मीटर वाफा प्रति वाफे | |
| | काढणी व जुडया बांधने | ३ x ३ मीटर वाफा प्रति वाफे | |
| २८ | फळभाज्या (टोमाटो, वांगी, मिरची, भेंडी) | | |
| | बी पेरणी | ३ x ३ मीटर वाफा प्रति वाफे | |
| | खतपाणी, निंदणी, फवारणी | ३ x ३ मीटर वाफा प्रति वाफे | |
| | काढणी | ३ x ३ मीटर वाफा प्रति वाफे | |
| २९ | कंदवर्गीय (कांदा,गाजर, मुळा) | | |
| | बी पेरणी | ३ x ३ मीटर वाफा प्रति वाफे | |
| | लावणी | प्रती हेक्टरी | |
| | खतपाणी, निंदणी, माती लावणे | प्रती हेक्टरी | |
| | खोदून काढणी | ३ x ३ मीटर वाफा प्रति वाफे | |
| ३० | ट्रॅक्टरद्वारे सरी वरंबा/रूंद सरी वरंबा तयार करणे | प्रती हेक्टरी | |
| क | फळपिके व फळरोपवाटिका | | |
| ३१ | झाडाला माती लावणे/टाचण | पेरू/डाळींब/बोर/शेवगा/सीताफळ/आवळा ई . | |

| | | | |
|---|---|---|---|
| | व आळे करणे (१० वर्ष पुढील प्रती झाड प्रमाणे) | (२ x २) मीटर क्षेत्र | |
| | | चीकू/आंबा/जांभूळ/चिंच/मोसंबी/संत्र ई.(२ x २) मीटर क्षेत्र | |
| ३२ | झाडे छाटणे प्रती झाड (३ वर्ष पुढील) | सीताफळ, डाळिंब, पेरू, द्राक्ष, अंजीर | |
| | | बोर,शेवगा, आंबा | |
| | | संत्री, मोसंबी, लिंबू छाटणी तसेच सल काढणे (६ वर्ष पेक्षा मोठे झाडे) | |
| | | वाफा प्रति वाफे | |
| | | वाफा प्रति वाफे | |
| ३३ | फळे, इतर पिके काढणे | सिताफळ, हनुमानफळ, बोर, संत्रा, मोसंबी, डाळींब, पेरू, कवठ (प्रति क्विंटल) | |
| ३४ | खड्डे खोदणे (चिकू बहुवर्गीय फळझाडे)- संत्र, मोसंबी ई) | ०.६ x ०.६ x ०.६ मीटर (मुरुम च्या ठिकाणी) | |
| ३५ | खड्डे भरणे (२x२x२ फुट) | शेणखत/रा. खत प्रती खड्डा | |
| ३६ | झाडांची लागवड | प्रती झाड | |
| ३७ | झाडांना वळण देणे | ३ वर्षापर्यंत प्रती झाड | |
| ३८ | झाडांना आधार देणे | प्रती झाड | |
| ३९ | वाफे तयार करणे | गादी वाफे, ०.१५ x १.२५ x ४ मीटर प्रती वाफे | |
| ४० | वाफयावर बी पेरणे | १ x ६ मीटर | |
| | वाफयावर पाणी देणे, खुरपणी, खत देणे | १ x ६ मीटर प्रती वाफा | |
| | वाफयावर पाणी देणे, खुरपणी, खत देणे | (०.६ x ०.४ x ०.२४ से.मी.) प्रती ट्रे प्रमाणे | |
| ४१ | फळ पिकांचे मातृवृक्षाचे आळे तयार करणे, टाचन खत देणे (६ x ६ मी . क्षेत्र) | प्रती आळे पाच वर्षावरील | |
| ४२ | फुलझाडे, शोभिवंत झाडे, छाटणी करणे | शोभिवंत झाडाची छाटणी, मोगरा, कागडा, गुलाब प्रति झाड | |
| ४३ | बांधावरील गवत कापणी व गोळा करणे | प्रति हेक्टर (बांधाचे क्षेत्र) | |
| ४४ | हिरवळीची मशिनचे सहाय्याने कापणी करणे (लॉन मोईंग करणे) व कापलेली हिरवळीचा एका ठिकाणी ढीग लावणे | साधारण लॉन मोअर (होन्डा टाईप) (प्रति आर) | |
| ४५ | झाडांना उकरी करून आळे करणे | प्रति झाड | |
| ४६ | प्रक्षेत्रावर विविध वृक्षा प्रजातींचे झाडे लावून देणे १.५ x १ x १ फूट आकाराच खड्डे खोदणे, झाडे लावणे, आळे करणे, पाणी व खते देणे | प्रति झाड | |
| ४७ | १.५ x १ x १ आळे करणे आणि निंदण करणे | प्रति झाड | |
| ४७ | झाडांच्या फांद्यांची छाटणी करणे | प्रति झाड | |
| ४७ | प्रक्षेत्रावरील विविध | प्रति १०० मीटर लांबी | |

| | | | |
|---|---|---|---|
| | प्रयोगांच्या संरक्षणासाठी सभोवती काटेरी वृक्ष प्रजाती च्या काटया कापून कुंपण करणे | | |
| ४८ | प्रक्षेत्रावरील झाडाखाली पडलेला पालापाचोळा एकत्र करून कंपोस्ट खड्डात टाकणे | प्रति एकर | |
| ४९ | प्रक्षेत्रावरील विविध वन वृक्षांचे फळे झाडावरून काढून गोळा करणे | प्रति किलो | |
| ५० | प्रयोग व प्रक्षेत्रावरील कामासाठी अकुशल मजूर (स्त्री/पुरुष) | प्रति व्यक्ती ८ तास | |
| ५१ | ट्रक्टर चालक | प्रति व्यक्ती ८ तास | |
| ५२ | प्रक्षेत्रावरील प्रयोगाची व कार्यालयाची देखरेख करणे | | |

**निविदा सूचनेमधील संपूर्ण अटी व शर्ती सर्वस्वी मान्य आहेत.**

ठिकाण:

दिनांक: